# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

**इतिहासवाचनापासून** जे अनेक फायदे आहेत त्यांमध्यें राष्ट्राच्या घडामोडींच्या स्थूल अवलोकनानें मनुष्यमात्रास जो एक प्रकारचा धडा मिळतो तो माझ्या मतें सर्वांत अत्यंत मौल्यवान् असा फायदा आहे. अशा तऱ्हेनें स्थूल अवलोकन करणारास हें तेव्हांच दिसून येईल कीं, जगांतील राष्ट्रांची घडामोड नित्य चालू आहे, व ह्या घडामोडीपासून उत्कर्षाचे स्थितींत असलेल्या राष्ट्रांनीं ज्याप्रमाणें पुढें मागें आपणांस अपकर्ष येण्याचा संभव आहे हें जरूर ध्यानांत बाळगिलें पाहिजे, त्याचप्रमाणें अपकर्षाचे स्थितींत असणाऱ्या राष्ट्रांनींहि पुढें मागें आपला उत्कर्ष खचित होईल अशी सदाशा निरंतर हृदयांत बाळगण्यास हरकत नाहीं. भरभराटींत असणाऱ्या ज्या राष्ट्रांना आपल्या शहाणपणाची घमेंड असेल त्यांनीं मागील इतिहासाकडे वळून ग्रीसची स्थिति पाहावी; ज्याला पराक्रमाचा अभिमान असेल त्यानें रोमचा इतिहास ध्यानांत आणावा; अंगच्या शौर्यावर वाटेल तें करूं असा ज्यांचा बाणा असेल त्यांनीं स्पार्टाकडे पाहावें; धर्माभिमान अंगीं असला म्हणजे अशक्य असें कांहींच नाहीं असें ज्यांस वाटत असेल त्यांनीं मुसलमानी राष्ट्राकडे नजर द्यावी; म्हणजे सर्व प्रकारच्या उद्दाम वृत्ति जागच्या जागींच जिरतील. दुसरे पक्षीं जीं राष्ट्रें नष्टदशेला येऊन पोंचलीं असतील व ज्यांच्यांतील विचारी देशभक्तांचीं मनें वेळोवेळीं निराशेनें व्यापून जात असतील त्यांनींहि मागील इतिहासाकडे पाहिलें म्हणजे आपत्तीच्या अंधेऱ्या रात्रीनंतर ऐश्वर्यसूर्य खचित केव्हांना केव्हां तरी उगवला पाहिजे असें त्यांस कळून येईल. आतां मृतराष्ट्रांचा पुनर्जन्म होण्यास कांहीं नियम आहेत व त्यांचे उदय एकाच कालछेदानें होतील असें नाहीं. परिस्थितीचे मानानें ती कालावधि बदलेल. तथापि, त्यास नियम नाहींत असें होत नाहीं. फार तर राष्ट्रांचा उदय धूमकेतूंच्या उदयासारखा आहे इतकेंच म्हणतां येईल. परंतु धूमकेतुसुद्धां नियमबद्धच आहेत. पुरीं हजार वर्षें दुःखांत व पारतंत्र्यांत काढल्यावर पूर्वींचे रोमचा म्हणजे हल्लींचे इटली या राष्ट्राचा अभ्युदय

# ग्यारीबाल्डी

## भाग १ ला

## जन्मवृत्तान्त

**क्रियासिद्धिः सत्वे भवति महतां नोपकरणे**

—भोजप्रबंध

**दैवायत्तं कुले जन्म, मदायत्तं च पौरुषं**

—वेणीसंहार

फ्रान्स व इटली या दोन देशांच्या सरहद्दीवर भूमध्य समुद्राला लागून असलेल्या आल्प्स पर्वताच्या एका भागाचे पायथ्याशीं नाईस या नांवाचें एक शहर हल्लीं वसलेलें आहे. एकोणिसाव्या शतकाचे प्रारंभीं नाईस हें निव्वळ खेडें होतें; तथापि त्याची रचना फारच निसर्गरमणीय होती. एका बाजूस लांबच लांब डोंगर गेलेले असून, दुरून आल्प्स पर्वताचीं बर्फानें आच्छादिलेलीं पांढरीं शुभ्र शिखरें स्वच्छ दिसत. त्याच्या पलीकडे माउंट ओबॅनो नांवाचा बळकट तटबंदीचा व शेंदीडशें वर्षे लढायांमध्यें झुंजलेला असा भव्य डोंगरी किल्ला एका उंच व तुटलेल्या कड्यावर उभा होता. त्याच्या भयाण छायेंत हें लहानसें खेडें गडप होऊन जात असे. दुसऱ्या बाजूस पाहिलें तर भूमध्य समुद्राच्या सुंदर निळ्या लाटा या खेड्यांतील घरांच्या पायऱ्यांवर आपटत. निवांत वेळीं किनाऱ्यावरील अवघ्या इमारतींच्या ओळींचें प्रतिबिंब समुद्राच्या स्वच्छ पाण्यांत पडत असे. तिसऱ्या बाजूस पाहावें तर आल्प्स पर्वतांमधून निघालेला एक मोठा ओढा या गांवाचे कडेनें खळखळ वाहत जाऊन समुद्राला मिळालेला होता. या खेड्यांत चालू शतकाचे आरंभीं कोळी लोकांची बरीच वस्ती असे. त्यांनीं होड्या बाळगाव्या, समुद्रांत जाऊन मासे धरून आणावे, व त्यावर आपली उपजीविका करावी. इतर कोणी याहून बऱ्या स्थितींत होते, त्यांचीही पण

उपजीविका समुद्रावरच चाले; म्हणजे कोणी परक्यांच्या जहाजावर नोकरी पत्करून खलाशाचें किंवा तांडेलाचें काम करीत व कोणी स्वतःच्या मालकीचीं जहाजें ठेवून व्यापार करीत.

अशा या खेडेगांवांत या शतकाचे प्रारंभीं डोमेनिको ग्यारीबाल्डी व त्याची बायको रोझा असें एक सुखी जोडपें राहत असे. डोमेनिको हा घरचें जहाज ठेवून व्यापार करी व रोझा गृहप्रपंच मोठ्या नीटनेटकेपणानें करून नवऱ्याला सुख देई. डोमेनिको व रोझा दोघेंहि स्वभावानें सज्जन व प्रेमळ अशीं होतीं. ग्यारीबाल्डी हें नांव फार जुनाट आहे; तें इतकें कीं, सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी रोम येथील प्रजासत्ताक राज्याचे वेळच्या कित्येक वरिष्ठ प्रतीच्या कुळांतून ग्यारीबाल्डी हें उपनांव प्रचलित असलेलें आढळतें. परंतु खुद्द डोमेनिको ग्यारीबाल्डीचे घराण्यांत या जुन्या नांवापेक्षां दुसरें कोणतेंहि ऐश्वर्य उरलेलें नव्हतें. डोमेनिकोचा आजा पुरा दरिद्री होता, व त्याच्या बापानें जे काय दोन पैसे मिळविले होते ते त्याचे त्यानेंच मूर्खपणानें सट्ट्याचे व्यापारधंदे व चैनबाजी करून उडवूनहि टाकिले होते. पुढें डोमेनिको वयांत आला, तेव्हां घरची अगदीं गरिबी असल्यामुळें प्रथम प्रथम त्याला निव्वळ कोळ्याचा म्हणजे मासेमाऱ्याचा धंदा करावा लागला. परंतु कोणताहि धंदा नेकीनें व मेहनतीनें केला असतां तो बहुधा सफल होतो; त्याप्रमाणें डोमेनिकोला असल्या हलक्या धंद्यांतहि चार पैसे मिळाले. नंतर त्यानें आपल्या मालकीचें एक जहाज घेऊन व्यापार चालविला. तथापि एकंदरीनें पाहतां, डोमेनिकोची घरची स्थिति गरीबीचीच होती म्हटलें तरी चालेल.

अशा या सुशील, सात्त्विक, धर्मभोळ्या, व गरीबशा जोडप्यास इ. स. १८०७ सालचे जुलई महिन्याचे २२ व्या तारखेस एक मुलगा झाला. त्याचें नांव जोसेफ. रोझा हिची आपल्या मुलांवर फारच ममता असे. जोसेफला तर ती अगदीं जीव कीं प्राण करी. आपला जोसेफ पुढें अचाट पराक्रमानें जगाला थक्क करून सोडील, व इटलीचा उद्धार करून पृथ्वीवरील स्वदेशभक्त मालिकेंतील शिरोमणि किंबहुना अवतारी पुरुष अशी कीर्ति मिळवील, हें त्या बिचारीच्या स्वप्नांतहि कधीं आलें नसेल. पण असें आलें असतें तरी काय? मुलगा म्हणून जोसेफवर तिचें जें प्रेम होतें तें वाढण्याला, त्या तिच्या हृदयांत वावच नव्हता!

पिडमांट येथें पहिला व्हिक्टर-ए-मॅन्युएल राजा राज्य करीत होता. या वेळच्या इटलींतील सर्व संस्थानांमध्यें पिडमांट येथील राज्य कमी जुलमी होतें. या राज्यांत दोन पक्ष होते. एकामध्यें उदार तत्त्वांवर राज्य चालावें असें म्हणणारी स्वातंत्र्यप्रिय मंडळी होती व दुसऱ्या पक्षामध्यें लष्करी कामगार, थोर घराण्यांतील उमराव, वगैरे अधिकारप्रिय लोक होते. परंतु दोन्हीहि पक्षांना पिडमांटच्या राजानें ऑस्ट्रियाच्या तंत्रानें चालावें ही गोष्ट नापसंत होती. त्यांनीं राज्यपद्धतीच्या तत्त्वांचा एक नवीन मसुदा तयार केला. त्याचें धोरण राजपद नाहींसें करावें असें नसून फक्त कनिष्ठ व श्रेष्ठ वर्गाच्या प्रजाजनांस कांहीं अधिक सत्ता असावी इतकेंच होतें. व्हिक्टर-एं-मॅन्युएल यास तें मुळींच संमत नव्हतें; तथापि त्यानें प्रजेवर एकदम शस्त्र धरलें नाहीं. लोक कांहीं केल्या ऐकेनात, तेव्हां मुकाट्यानें राज्य सोडून तो चालता झाला. त्याचे मागून त्याचा वारस चार्लस फेलिक्स हा गादीवर बसावयाचा, परंतु तो पिडमांट येथें त्या वेळीं हजर नव्हता. त्याचे गैरहजेरींत त्याचा जवळचा नातलग चार्लस आलबर्ट हा रीजंट या नात्यानें काम पाहात होता. त्यानें अॅलेक्झांड्रिया व ट्यूरीन येथें बंडें होतांच लोकांच्या मागण्या एकदम कबूल करून त्याप्रमाणें द्वाही फिरविली. परंतु चार्लस फेलिक्स यास तें करणें मुळींच आवडलें नाहीं. शिवाय लोकसत्तेची बंडाळी मोडण्याकरितां ऑस्ट्रिया त्यास हवी ती मदत करण्यास तयार होताच. तसेंच इटलीमध्यें शांतता राखण्याकरितां रशियानेंहि एक लाख सैन्य सज्ज केलें असून तें इटलीकडे यावयास निघालें अशीहि बातमी पसरली होती. यामुळें पिडमांट येथील बंडवाल्यांची बरीच निराशा झाली. तथापि कारबोनेरी पंथाचीं तत्त्वें वरिष्ठ प्रतीचे लोक व तरुण कामदार यांजमध्यें फारच पसरलेलीं होतीं. पिडमांट येथील मोठमोठ्या कुलीन स्त्रियाहि कारबोनेरी मंडळीस सामील झाल्या असून काळीं, निळीं, तांबडीं अशीं निरनिराळ्या प्रकारचीं निशाणें कारबोनेरी पक्षाचे वतीनें त्यांनीं उभारलीं. बंडामुळें लोकांचे अंगांत संचारलेला त्वेष व अभिमान अद्याप जागृत होता. यामुळें बंडवाल्यांनीं आपलें सैन्य तर ऑस्ट्रियाचे तोंडावर पाठविलेंच, परंतु राजाचें लष्कर आपल्यास सामील होईल अशी जी त्यांस आशा होती ती अगदीं आयत्या वेळीं खोटी ठरल्यामुळें त्यांचा लढाईंत पुरा मोड झाला. बंडवाल्यांचे पुढारी समुद्रावर वाट सांपडेल तिकडे पळून गेले.

अशा रीतीनें कारबोनेरी मंडळीच्या प्रसारामुळें व शिकवणीमुळें इटलींत जीं लहान मोठीं बंडें झालीं त्या सर्वांचा ऑस्ट्रियानें आपल्या सैन्यांचे जोरावर मोड केला. या बंडाच्या संबंधानें एक गोष्ट दिसून येते. ती ही कीं, कनिष्ठ प्रतीची प्रजा म्हणजे शेतकरी, उदमी, व साधारणतः सर्व अशिक्षित लोक या बंडापासून अलिप्त असत. बंडवाले म्हटले म्हणजे बहुतेक सुशिक्षित लोक असत. निदान पुढारी तरी सुशिक्षितांशिवाय दुसरे कोणी नव्हते. वास्तविक ही गोष्ट युरोपच्या इतिहासांतील सामान्य नियमास अनुसरूनच होती. कोणत्याहि देशांत ज्या कांहीं राजकीय चळवळी घडून येतात, त्यांस मध्यम प्रतीच्या व शिक्षण पावलेल्या अशा लोकांचा जो एक वर्ग असतो तोच प्रायः कारणीभूत होतो. श्रीमंत लोक बहुधा नेहमींच राज्यक्रांतीच्या विरुद्ध असतात. याचें कारण असें आहे कीं, तिजमुळें होणाऱ्या स्थित्यंतरानें त्यांस आपलें नुकसान होण्याची फार भीति वाटते. दुसऱ्या पक्षीं अगदीं गरीब व कनिष्ठ वर्गाचे प्रजाजनहि राज्यक्रांतीला फारसे अनुकूल असत नाहींत. याचें कारण असें आहे कीं, राज्यक्रांतीचें खरें स्वरूप काय व ती झाली असतां आपली स्थिति कशी सुधारेल, याची त्यांस चांगलीशी कल्पना नसते. अशा रीतीनें अति श्रीमान् व अति गरीब लोक, यांचेकडून राज्यक्रांतीची प्रथम चळवळ कधींहि होत नाहीं. सर्व राज्यक्रांत्या मध्यम स्थितींतील सुशिक्षित लोकांकडूनच प्रथम घडून येतात. निदान त्यांच्या मूळ कल्पना तरी मध्यम वर्गांतील लोकांच्याच डोक्यांतून निघतात; व त्या कल्पना सिद्ध होण्यास जी एक शक्ति, जो एक जोम किंवा त्वेष राष्ट्राच्या अंगीं यावा लागतो, तो सर्व तेच उत्पन्न करतात.

वरील बंडांसंबंधानें दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, ती ही कीं, त्या बंडांत प्रत्यक्ष यश आलें नसल्यामुळें तीं करणाऱ्या लोकांस तत्कालीन शिष्ट लोकांनीं मूर्खांत काढलें. ऑस्ट्रियाचा पाय इटलीमध्यें जो एक वेळ घुसला होता तो केवळ या बंडांमुळें कायमचाच घुसणार असेंच प्रथम प्रथम कांहीं वेळ लोकांस वाटलें. आपली शक्ति ती काय, आपण मूठभर माणसें, आपणांत एकी नाहीं, परक्यांचें साहाय्य व शत्रु अति प्रबळ, असें असतां अकालीं लहानसहान बंड करण्यास प्रवृत्त होणें म्हणजे आपल्या गळ्याशीं आधींच बसलेला दास्यत्वाचा फांस अधिक घट्ट करून घेणें होय, असें पुष्कळांचें त्या वेळीं म्हणणें होतें. तथापि आधीं सर्वांची एकी करून व

# भाग ४ था
# मॅझिनीचा वृत्तान्त

**न तच्छस्त्रैर्न नागेंद्रैः न हयैर्न च पत्तिभिः ।**
**कार्यं संसिद्धिमभ्येति यथा बुद्ध्या प्रसाधितम् ॥**

— पंचतंत्रम्

जोसेफ मॅझिनी हा जिनोआ येथें १८०५ या सालीं जन्मास आला. त्याचा बाप गिआकोमो मॅझिनी हा एक प्रसिद्ध वैद्य व शारीर शास्त्राचा अध्यापक होता. त्याची आई मेराया ही अत्यंत रूपवती, बुद्धिवान् व प्रेमळ स्त्री होती. मॅझिनी बाळपणीं फार नाजूक व अशक्त असे. तो इतका कीं, एक दोन वर्षांचा होईपर्यंत त्याला उभेंसुद्धां राहतां येत नसे. तो सुमारें सहा वर्षांचा झाला तेव्हां कोठें त्यास कोणाचा हात न धरतां ताठपणें चालतां येऊं लागलें. मॅझिनी हा शरीरानें जितका अशक्त तितकाच बुद्धीनें प्रबळ होता. बाळपणापासून अन्यायाचा याला संताप असे व कोणाचीहि गरिबी पाहिली कीं त्याचें कोंवळें मन अतिशय द्रवत असे. जन्मतःच तो मानव जातीचा व जुलमाचा शत्रु होता म्हटलें तरी चालेल. वास्तविक घराबाहेर तो फारसा पडत नसल्यामुळें आपत्ति व दारिद्र्य यांचें दुःख कसें असतें याची कल्पना त्यास येण्यासारखी नव्हती. परंतु ममता हा त्याचा उपजत गुणच होता. कोणीहि अनाथ, दुबळा, निराश्रित, पंगू किंवा रोगग्रस्त मनुष्य त्यानें पाहिला म्हणजे त्याचे गळ्यास जाऊन मिठीच मारावी, त्याला कुरवाळावें व 'कांहीं तरी त्याला दे, कांहीं तरी दे, तो किती गरीब आहे पहा ग' असें म्हणून आपल्या आईच्या मागें हट्ट घेऊन लागावें. लहानपणापासून त्याचा स्वभाव गंभीर व विचारी असे. पोरांचे खेळ त्याला मुळींच आवडत नसत. केव्हांहि कोणी तुला काय हवें म्हणून विचारलें असतां, नेहमीं 'पुस्तक द्या' असें त्यानें म्हणावें. तो अवघ्या पांच वर्षांचा असतां त्याचे बिछान्यावर जिकडे तिकडे पुस्तकें पडलेलीं असत व कधीं पुस्तकें वाचीत तर कधीं नकाशावर आडवा पडून भूगोल शिकत असलेला तो दिसे. ही त्याची वृत्ति पाहून पुढें हा कोणी मोठा पुरुष निपजणार अशी पुष्कळ जणांनीं त्याच्या आईची खातरजमा केली होती.

इटलीमध्यें अतिशय वाढलें. ही मंडळी स्थापन करणारे लोक अप्रसिद्ध, गरीब, व तरुण असतां इतक्या थोड्याच काळांत तिचें इतकें महत्त्व वाढलें कीं, इटलींतील सातहि संस्थानांतील राजे तिला भिऊन तिच्या सभासदांचा छळ करूं लागले. येवढ्याच गोष्टीवरून तिचा पाया भक्कम व उदात्त तत्त्वांवर रचिला होता हें सिद्ध होतें.

असो. मॅझिनीचें वर्तमानपत्र लोकांना जितकें प्रिय तितकेंच अधिकाऱ्यांना अप्रिय झालें होतें. त्यांनीं त्या वर्तमानपत्राचा प्रसार बंद करण्याकरितां अनेक खटपटी केल्या. जो कोणी त्या वर्तमानपत्राचे अंक धरून देईल त्यास बक्षिसें दिलीं जात व ज्या कोणावर त्यांचा प्रसार केल्याचा आरोप शाबीत होई, त्यास जबर शिक्षा देत. येवढेंच काय, पण त्या वर्तमानपत्राची नालस्ती किंवा त्यास प्रतिबंध करण्याचा प्रयत्न न करणें हें एक गुन्ह्याचें नवीन सदरच काढलेलें असून, तो करणारास दोन वर्षांची शिक्षा व दंड होई, व त्या अपराधाची बातमी देणारास त्यांतील निम्में बक्षिस मिळे. या व यासंबंधीं इतर अपराधांची चौकशी करण्याकरितां लष्करी अधिकाऱ्यांची एक न्यायसभाहि नेमली होती. या न्यायसभेपुढें मॅझिनीचें वर्तमानपत्र वाचल्याचा ज्यांवर आरोप असेल त्यांस आणीत व ज्यांवर तो शाबीत होई त्यांस पाठीमागून गोळी घालून ठार मारीत. इतकेंहि करून मॅझिनीच्या वर्तमानपत्राचा प्रसार बंद होत नाहीं असें पाहून, इटलींतील राजांनीं फरान्सच्या लुई फिलीप राजास मॅझिनीला पकडण्याची विनंति केली. तेव्हां फिलिपच्या हुकुमावरून मॅझिनीला पकडण्यास पोलिस सुटले. परंतु दोन वर्षेपर्यंत त्याचा त्यांस पत्ताच लागला नाहीं. एका जागेहून दुसरीकडे , दुसरीहून तिसरीकडे, असें करून मॅझिनीनें आपल्या राहण्याचें ठिकाण दोन वर्षेपर्यंत गुप्त राखिलें. शेवटीं एके दिवशीं अशी मौज झाली कीं, मॅझिनी अमुक एका घरांत आहे असें कळतांच, पोलिसांनीं त्या घरास वेढा दिला. तेव्हां मॅझिनीसारखाच किंचित् दिसणारा त्याचा एक स्नेही होता तो मीच मॅझिनी, असें सांगून पोलिसाचे स्वाधीन झाला. इकडे दुतर्फा उभे राहिलेल्या पोलिसांच्या रांगेंतून खरा मॅझिनी खुशाल सावकाश चालता झाला व सुरक्षित बाहेर पडून स्वित्झर्लंड देशास पळून गेला.

यापुढें मॅझिनी इटलींत नव्हता, तथापि '**तरुण इटली**' मंडळीचें काम बंद पडलें नाहीं. याचें कारण असें कीं, तें काम अमुक एकानेंच करण्याचें

असें नव्हतें. स्वदेशाभिमान एकाद्या समाजांत एकदां जागृत झाला म्हणजे मग तो वणव्यासारखा चरत जातो. मॅझिनी जरी जाग्यावर नव्हता, तथापि त्याच्या शिकवणीनें इटलींतील तरुण मंडळीच्या मनांत जें एक स्वदेशप्रीतीचें बीज रुजलें, तें एकसारखें वाढतच गेलें.

इकडे स्वित्सर्लंडमध्यें गेल्याबरोबर मॅझिनीच्याभोंवतीं जर्मनी, फरान्स, इटली, व पोलंड इत्यादि देशांतून हद्दपार केलेली मंडळी बरीच येऊन मिळाली. 'तरुण इटली' मंडळीच्या नमुन्यावर '**तरुण युरोप**' या नांवाची एक नवीन मंडळी त्यांनीं काढली. ही मंडळी काढण्यांत मॅझिनीचा मुख्य हेतु असा होता कीं, राजकीय जुलुमाविरुद्ध सर्व युरोपखंडांत लोकमत जागृत करावें व जसजशी ही मंडळी हद्दपार होऊन एका देशाहून दुसऱ्या देशांत व दुसऱ्याहून तिसऱ्या देशांत आसरा घेण्यास जातील, तसतसा लोकसत्तेच्या उदार तत्त्वांचा प्रसार सर्व युरोपखंडभर व्हावा. मॅझिनीचा हा प्रचंड हेतु अखेर शेवटास गेला हें यानंतर घडून आलेल्या इतिहासावरून सिद्ध होतें.

असो. येथवर सांगितलेल्या हकीकतीवरून इटलीमध्यें लोकमताची जागृति कशी झाली व ती होण्यास मॅझिनीसारखे लोकशिक्षक व त्यांनीं स्थापिलेल्या मंडळया कशा उपयोगी पडल्या हें कळून येईल. मॅझिनीचें वर्तमानपत्र वाचून व त्यानें स्थापन केलेल्या मंडळयांतील प्रमुख देशभक्तांचीं संभाषणें ऐकल्यानें ग्यारीबाल्डीचे मनाची पक्की तयारी होऊन राहिली होती. परंतु त्याच्या हृदयांत जो त्वेष व उत्साह उसळलेला होता, तो कृतीचे रूपानें बाहेर पडण्यास प्रथम कोणतें कारण झालें याची हकीकत पुढील भागीं येईल.

---

## भाग ५ वा

# देशकार्याचा ओनामा

**विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमाना ।**
**प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ॥**

**ग्या**रीबाल्डीच्या खऱ्या चरित्रास इसवी सन १८३४ या सालीं सुरुवात झाली. त्या वेळीं तो अवघा २७ वर्षांचे वयाचा होता. या वेळीं

त्याला पोंहोचवायला गेले. तेथून पुढें कांहीं एक दगाफटका न होतां ग्यारीबाल्डी मार्सेलिसला जाऊन पोंहोचला.

तेथें जातांच त्याच्या हातीं सहजच एक वर्तमानपत्र पडलें. त्यांत पाहतो तों आपणास फांशीची शिक्षा फर्माविलेली आहे असें त्याला आढळून आलें. आपलें नांव आज प्रथमच पण अशा रीतीनें छापलेलें पाहून त्याला मोठें नवल वाटलें. तेव्हां यापुढें आपलें नांव कायम ठेवणें सुरक्षित नाहीं असा विचार करून **एम्. पेन** असें नांव त्यानें धारण केलें. नंतर कांहीं दिवस एका स्नेह्याच्या येथें काढून पुढें यूनियन नांवाच्या गलबतावर त्यानें चाकरी धरली.

पुढें मार्सेलिस येथें महामारीचा उपद्रव सुरू झाला. तो इतका भयंकर होता कीं, त्या वाख्यानें हजारों लोक गांव सोडून गेले. कोणाहि वैद्याचें औषध चालेना. रोग्यांना औषधपाणी करण्यास कोणी माणूस मिळेना. जे लोक गांवांत राहिले होते ते घरांतील माडयांवर राहिलेले असून जेवण-खाणासुद्धां खालीं न येतां अन्नपाणी दोऱ्यांनीं वर उचलून घेत! अशा ह्या वेळीं ग्यारीबाल्डी इस्पितळांत राहून रोग्यांची शुश्रूषा करी. स्वतःच्या प्राणाची त्याला कधींहि पर्वा नसे. परोपकार करण्यामध्यें मृत्यु आला तरी बेहत्तर, परंतु हातून होईल तितका परोपकारच करावयाचा असा त्याचा निश्चय झाला होता.

मार्सेलिसहून ग्यारीबाल्डीनें निरनिराळ्या जहाजांवर वरींच जलपर्यटणें केलीं. परंतु त्याच्या चित्तास समाधान नव्हतें. आपण इटली सोडण्यापूर्वी कोणचे विचार करीत होतों, व हातून कांहीं एक न घडून येतां पहिल्याच घासाला माशी लागावी त्याप्रमाणें आपला हातीं घेतलेला पहिलाच उद्योग निष्फळ होऊन आपणांस फांशीची शिक्षा झाली, ती चुकविण्याकरितां आपण परमुलुखांत येऊन पडलों व इतउत्तर देशकार्य करण्याची पुन्हा संधि येण्याचा संभवहि कायमचा खुंटला, अशा विचारानें तो नेहमीं उदास असे. तथापि शेवटीं कांहींसें वैतागानें व कांहींसें दूर जलपर्यटन करण्याच्या आवडीनें त्यानें दक्षिण अमेरिकेंत जाणाऱ्या एका गलबतावर नोकरी धरिली; व बरेच दिवस प्रवास करून तो रीयोजानिरीओ येथें जाऊन पोंहोचला.

---

येथील अधिकाऱ्यांनीं त्याचे उतराई होण्याकरितां पुष्कळ खटपट केली. रिओडीलापलाटा येथील फरेंच आरमारावरील सरदारानें तर ग्यारीबाल्डीस असें लिहिलें कीं, "तुम्ही केलेल्या पराक्रमांनीं नेपोलियनच्या प्रख्यात सैन्यालासुद्धां भूषण आलें असतें." मॉंटीव्हिडो येथील लोकांनीं त्यास बहुमानार्थ सरदार ही पदवी दिली; त्यावरूनच पुढें अमेरिका व युरोप-खंडामध्यें सरदार (जनरल) ग्यारीबाल्डी असें त्याचें नांव पडलें. परंतु जेव्हां ते लोक त्याला जमिनी वगैरे बक्षीस देऊं लागले, तेव्हां 'केवळ स्वतंत्रतेकरितांच आम्ही लढलों. कोणत्याहि रीतीनें पैसा किंवा इतर नफा मिळविण्याकरितां लढलों नाहीं. असें सांगून त्यानें तें बक्षीस नाकारलें. येवढेंच काय परंतु स्वतःकरितां किंवा आपल्या लोकांकरितां लष्करी बहुमानाची बढतीहि त्यानें पत्करिली नाहीं. यासंबंधानें त्यानें आपल्या एका पत्रांत लिहिलें आहे कीं, "जें कार्य संपादन करण्यांत माझ्या इतक्या इटालियन देशबांधवांचे बळी पडले, त्याबद्दलचा बहुमान त्यांच्यामागें जिवंत राहून स्वीकारला तर त्या पापाच्या ओझ्यानें मी मरण पावेन." अशी कांहीं त्याची निस्पृहता लोकोत्तर होती.

या वेळची त्याची गरिबी व साधेपणा मासलेवाईक होता. इतका कीं, त्याच्या अंगांत कधीं धड सदरा देखील असावयाचा नाहीं. त्याचें राहण्याचें ठिकाण म्हणजे एक अगदीं साधी झोंपडी होती. तिच्या कवाडास कडी देखील नसून तें रात्रंदिवस अगदीं उघडें असे. एके दिवशीं फरेंच आरमारावरचा एक अधिकारी त्यास भेटावयास आला. संध्याकाळ होऊन अंधेर पडला होता. त्या अधिकाऱ्यानें कसें तरी एकदां दार उघडून आंत प्रवेश केला, तों वाटेंत असलेल्या एका खुर्चीची त्याला धडक बसली. तेव्हां ग्यारीबाल्डीस हांक मारून तो विनोदानें म्हणाला, "काय हो, तुम्हांस भेटावयास यावयाचें म्हणजे आधीं प्राण दिला पाहिजे!" हें ऐकतांच ग्यारीबाल्डीनें आपल्या बायकोस हांक मारून तिला दिवा आणावयास सांगितलें. तेव्हां तिनें आंतूनच उत्तर केलें "दिवा कोठचा आणूं! घरांत मेणबत्त्या विकत घ्यावयास पैसे असतील तर ना?" शेवटीं त्या उभयतांचें बोलणें अंधेरांत बसूनच झालें. दुसरे दिवशीं त्या सरदारानें ग्यारीबाल्डीला वीस पौंड पाठवून दिले. ते तसेच परत करणें वाईट दिसलें असतें म्हणून त्यानें ठेवून घेतले व दुसऱ्या दिवशीं गांवांतील गरीब, विधवा व भिकार जमवून ती सर्व रक्कम त्यानें

इकडे मॅझिनीकडून त्यास सविस्तर पत्रहि आलें. त्यांत आनंदायक अशी खबर लिहिलेली असून मॅझिनीनें ग्यारीबाल्डीस इटलींत परत बोलाविलें होतें. यामुळें प्रवासाची तयारी जारीनें करण्यास त्याला दुप्पट उमेद आली. परंतु पुरेशी वर्गणी जमेना ! मॉंटीव्हिडोवर ग्यारीबाल्डीचे पुष्कळ उपकार झालेले असल्यामुळें तेथील लोकांनीं तरी त्यास कृतज्ञपणानें मदत करावयाची; पण तें एकाच बाजूस राहून, परत जाण्यास जितके म्हणून अडथळे त्यांस आणितां आले तितके त्यांनीं आणिले. परंतु ग्यारीबाल्डीचा उद्योग त्याच्या उत्साहाइतकाच प्रबळ असल्यामुळें त्यांचे हेतु सिद्धीस गेले नाहींत. ज्या जहाजावरून ग्यारीबाल्डी व त्याचे सोबती इटलीस परत जाणार होते, त्याचा मालक त्यांचेपासून अगदीं आयत्या वेळीं अवाचें सवा भाडें मागूं लागला. यामुळें त्यांस आपले अंगांतील कपड्यांखेरीज बाकीची सर्व चीजवस्त, वस्त्रप्रावर्ण विकून त्याचे पैसे करावे लागले. परंतु त्यानें तितकेंहि केलें. शेवटीं एका जिनोई व्यापाऱ्यानें त्यास एक मोठी रक्कम बक्षीस दिली, व मॉंटीव्हिडो येथील लोकांनीं त्यास दोन तोफा व कांहीं बंदुका बक्षीस दिल्या. सरते शेवटीं ग्यारीबाल्डी एकदांचा आपल्या सोबत्यासह १८४८ चे मार्चचे २६ वे तारखेस अमेरिका सोडून निघाला.

अमेरिका सोडतांना त्याचे मनास अतिशय वाईट वाटलें. अमेरिकेवर त्याचें प्रेम होतें. कारण सुमारें चौदा वर्षेपर्यंत अमेरिका ही त्याच्या निःस्वार्थी पराक्रमांची व यशापयशांची कर्मभूमि होऊन राहिली होती. वास्तविक पाहतां अमेरिका ही परदेशाची भूमि, पण मॉंटीव्हिडोच्या रक्षणाकरितां त्यानें उभारलेले इटालियन स्वयंसेवक, त्यांनीं केलेल्या घनघोर लढाया व गाजविलेले पराक्रम यांचें सतत सान्निध्य असल्यामुळें, तेथेंहि एक प्रकारचें स्वदेशत्व निर्माण झालें होतें असें म्हटलें पाहिजे. शिवाय, पुढें इटलीमध्यें आयत्या वेळीं स्वयंसेवक जमवून लढाया करण्याची जी अपूर्व पद्धत त्यानें अंमलांत आणली तिचें मूळ बीज प्रथम अमेरिकेंतच पेरलें गेलें. अमेरिकेमध्यें शेंकडों इटालियन स्वयंसेवक स्वतंत्रतेचे कार्यांत मरण पावले होते, व अशा उदार सोबत्यांनीं ज्या भूमीवर समाधि घेतल्या होत्या ती मागें सोडून जातांना ग्यारीबाल्डीस अर्थातच रडूं आलें.

परंतु किती झालें तरी स्वदेश तो स्वदेश ! स्वदेश सोडून चौदा वर्षें झालीं व मध्यंतरीं त्याच्या जीवितक्रमांत पुष्कळच फरक पडला; तथापि इतक्या

मोठें दडपण एकदांचें निघालें. या भरंवशानें रोमचे नागरिक लोक मोठ्या आनंदांत होते. शहरांत कोठें दंगाधोपा किंवा कांहीं एक गडवड न होतां नवीन स्थापिलेलें राज्य शिस्तीच्या मार्गास लागलें होतें. परंतु अद्यापि रोमच्या वाहेरचे लोक तटस्थ असल्यामुळें रोमच्या नागरिकांस वाहेरून मदत होईल अशी फारशी आशा नव्हती. अशा स्थितीमध्यें रोमच्या लोकांनीं आपला आपणच कसा बचाव करावा या विवंचनेंत बंडवाल्याचे पुढारी पडले.

इतक्यांत ग्यारीबाल्डी रोम शहरास आला. त्याचेपुढें हें लढाईचें ताट वाढून ठेवलेंच होतें; आणि तें त्यास हवेंच होतें. शहराची व्यवस्था करण्याकरितां मॅझिनी व इतर दोन गृहस्थ अशा तिघांस राज्यकारभाराची पूर्ण मुखत्यारी मिळालेली होती. त्यांचे परवानगीनें 'कर्नल' ग्यारीबाल्डी हा रीटी नांवाच्या किल्ल्यांत परत गेला व तेथें त्यानें तटबंदीची दुरुस्ती करून आगाऊ असलेल्या व प्रत्यहीं नवीन नवीन येऊन मिळणाऱ्या शिपायांना पोषाख वगैरे देऊन कवाईत शिकविण्यास प्रारंभ केला. या वेळीं ग्यारीबाल्डीजवळ सुमारें २,५०० सैन्य होतें. त्यामध्यें मॉंटीव्हिडो येथें त्याच्या लष्करांत असलेले पांचपन्नास शिपाई, तसेंच व्हेनिसहून नोकऱ्या सोडून देऊन आलेले ३०० सरकारी नोकर, ४०० युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी असे निरनिराळ्या प्रकारचे लोक होते. ग्यारीबाल्डी तापांतून नुकताच उठलेला असून या नवीन उद्योगांत त्याला स्वस्थता मुळींच मिळत नसे. तथापि त्यानें लष्कर जमविण्याचें व कवाईत शिकविण्याचें काम खूप जारीनें सुरू केलें होतें. त्याचें उदाहरण पाहून त्याचे लोकहि परस्परांशीं एकदिल व देशकार्यांत तल्लीन होऊन गेले होते.

चार्लस आल्बर्ट राजा अद्यापि समरांगणांत उभा होता. रोमच्या नवीन अधिकाऱ्यांचा प्रथमचा वेत त्यास कुमक करण्याकरितां कांहीं सैन्य पाठविण्याचा होता. परंतु पुढें लवकरच नोव्हॅरा येथें चार्लस आल्बर्ट याचा ऑस्ट्रियन सरदारानें पराभव केला. इकडे फरान्स व ऑस्ट्रिया यांचीं सैन्येंहि मजल दरमजल करीत रोमवर येत होतीं. या दोन सैन्यांपैकीं फरान्सच्या सैन्यानें आपण रोममधील लोकसत्तात्मक राज्य मोडण्यास आलों नसून, पोपच्या राज्यांत शांतता करण्याकरितांच आलों आहों अशी वतावणी केली. या वतावणीस मात्र मॅझिनी फसला. परंतु ग्यारीबाल्डीला खरें वर्म माहीत असल्यामुळें त्यानें होतां होईल तितकें करून फरान्सचे सैन्यास आपण रोमचे

वर्गणी मिळविण्याचें काम सुरू झालें. अशा रीतीनें ग्यारीबाल्डीचें काम बसल्या बसल्या चालू होतें. आळस हा त्याला शत्रूप्रमाणें वाटे. तो जो जो म्हणून उद्योग करी, त्या सर्वांत परोपकाराचें बीज नव्हतें असें कधींच झालें नाहीं. या एकांतवासांतहि हातून अर्धेमुर्धें राहिलेलें स्वदेशकार्य त्याच्या डोळ्यांपुढें सदासर्वदा उभें असे. इटलींत काय गडबड चालली असेल याविषयींची माहिती तो मोठ्या उत्सुकतेनें मिळवी. या एकांतवासाचे शीतळाईनें त्याच्या मनांतील त्वेषाग्नि मुळींच निवाला नसून, कालगतीनें व शांत विचारानें तो अधिकच वृद्धिंगत होत होता.

१८५४ सालीं तो कांहीं कामानिमित्त इंग्लंडास गेला. त्या वेळीं न्यूकॅसल येथील लोकांनीं त्याचें मोठ्या थाटानें स्वागत केलें व एक मानपत्र, एक दुर्बीण, एक तरवार, अशीं त्यास नजर केलीं. ग्यारीबाल्डीस इंग्रजी चांगलेसें बोलतां येत नसे, म्हणून त्यानें थोड्याच शब्दांनीं त्यांचे आभार मानले; व ते मानतांना असें बोलून दाखविलें कीं, "जी तरवार आज मला माझ्या उदार मित्रांकडून बक्षीस मिळाली आहे, ती माझ्या आवडत्या कार्यांत म्हणजे स्वदेशस्वातंत्र्य परत मिळण्याचे कामीं उपसण्याचा दिवस सुदैवानें कधीं येईल हें आजच मला सांगतां येत नाहीं; परंतु इटली हें पुढें मागें स्वतंत्र होणार यांत शंका नाहीं. माझ्या देशाच्या संकटसमयीं या उदार मनाच्या परदेशीयांनीं इटलीस जें साहाय्य केलें त्याबद्दल त्यांचे आभार इटलीनें मानण्याचा दिवस लवकरच खास उजाडेल."

वरील शब्द त्या वेळीं जितक्या कळकळीचे होते, तितकेच ते पुढें खरे ठरले. ग्यारीबाल्डीची तरवार इटलीकरितां नेहमीं सज्ज होती. परंतु ज्यांचे हातीं इटलींतील सर्व सैन्यावरील सत्ता व राज्यकारभाराचीं सूत्रें होतीं, त्यांनीं लढाईस प्रारंभ केल्याखेरीज या त्याच्या तरवारीचा उपयोग काय? परंतु ही संधि ग्यारीबाल्डीस लवकरच मिळाली. त्याची हकीकत पुढील भागांत येईल.

नव्हती असें मात्र नाहीं. तें कसेंहि असो, नेपल्सचें राज्य पिड्मॉंटचे राज्यास जोडण्याचा निश्चय करून त्या बाबतींत कॅव्हूर यानें पार्लमेंटांत अनुकूल असा ठराव करून घेतला येवढें खरें.

व्हिक्टर-ए-मॅन्युएल हा कॅव्हूर याचे विचाराबाहेर अर्थातच नव्हता. तथापि एक अडचण येऊन पडली ती अशी कीं, फरान्सचा बादशहा नेपोलियन याचे हातांत इटलींतील घडामोडीचीं सूत्रें अद्यापि होतीं, व पिड्मॉंटचे राजानें इटलींतील संस्थानें जिंकून आपल्या राज्यास सामील करण्याची ही रीति त्यास पसंत पडेल किंवा नाहीं याबद्दल किंचित् शंका वाटत होती. तथापि कॅव्हूर यानें नेपोलियनचें मन वळवून घेण्याचा प्रयत्न केला व तो सिद्धीसहि गेला. नेपोलियननें कॅव्हूरच्या वकिलास असा जबाब दिला कीं, योजिलेलें कृत्य करणें कॅव्हूर यास अत्यावश्यक वाटत असेलच तर तें त्यानें आपल्या जबाबदारीवर खुशाल करावें; परंतु ह्या कामीं ऑस्ट्रियाशीं युद्ध करण्याचा प्रसंग आला तर फरान्सकडून पूर्वींप्रमाणें मदत होणार नाहीं येवढें मात्र लक्षांत ठेवावें.

ही पडत्या फळाची आज्ञा मिळतांच कॅव्हूर हा आपल्या तयारीस लागला. त्यानें युरोपांतील सर्व राष्ट्रांस लिहून कळविलें कीं, आज जर नेपल्स आम्हीं आपल्या राज्यास जोडलें नाहीं, तर सर्व इटलीचे शांततेस धक्का बसून राजसत्तेस मोठाच अपाय होणार आहे. अशा रीतीनें परराष्ट्रांकडून कदाचित् होणाऱ्या प्रतिबंधाचा आगाऊ बंदोबस्त करून कॅव्हूर यानें नेपल्सवर पाठविण्याकरितां सैन्य सज्ज केलें. या सैन्याबरोबर राजा व्हिक्टर-ए-मॅन्युएल यानें स्वतःच जावें असें ठरलें.

इकडे कॅव्हूर यानें नेपल्स येथें आपल्या गुप्त हेरांकडून फर्डीनंड राजाविरुद्ध बंड करण्यास लोकांना चिथावण्याचा क्रम चालविला होता व वरकरणी फर्डीनंड राजाशीं सलोख्याचें बोलणेंहि सुरू केलें होतें. तसेंच फर्डीनंडचे ताब्यांतील मार्चेस या प्रांतांतील कांहीं अर्जदार आपणाकडे आणण्याची गुप्त खटपट करून कॅव्हूर यानें त्यांस उघडपणें असें आश्वासन दिलें होतें कीं, तुम्हांस योग्य स्वतंत्रता मिळेल अशी आम्ही लवकरच व्यवस्था करूं. इतकी सिद्धता आधींच झालेली होती. शिवाय ग्यारीबाल्डीचे सैन्यानें नेपल्स पूर्वींच जिंकलें होतें; तेव्हां व्हिक्टर-ए-मॅन्युएल यास फक्त नेपल्स येथें जाऊन लोकांचे मुजरे घेऊन आपल्या नांवाची द्वाही फिरवावयाची येवढेंच काय तें करावयाचें उरलें होतें. तें करण्यास तो लवकरच निघाला.

घेतलें होतें. कॅव्हूर व व्हिक्टर-ए-मॅन्युएल यांच्याहि मनांत रोम काबीज करण्याची उत्सुकता फार होती. परंतु तसें करण्यास एक मोठी अडचण होती. ती ही कीं, रोम हें पोपच्या ताब्यांत होतें व त्यास फरेंच बादशहाचा आश्रय होता. त्यामुळें रोमवर स्वारी करावयाची म्हणजे, प्रथम फरान्सबरोबर युद्ध करण्यास तयार होण्यासारखें होतें. या विचारानें वरील मुत्सद्द्यांचे विचार जागच्या जागींच राहात. परंतु ग्यारीबाल्डीला रोमच्या मार्गांतील अडथळे दिसत असले तरी त्यांस तो जुमानणारा नव्हता. त्याचें धैर्य हें डोंगराच्या पायथ्यावर तुटून पडून आदळणाऱ्या लाटेप्रमाणें होतें. वरील विचारी मुत्सद्यांपेक्षां त्याजमध्यें एक गुण विशेष होता. तो हा कीं, वरील मुत्सद्द्यांपेक्षां लोकांच्या मनाचा कयास त्यास अधिक बरोबर रीतीनें कळत असे. ग्यारीबाल्डीचें पुढारीपण व रोम काबीज करण्याची लोकसमाजाची उत्कट इच्छा, या दोन गोष्टींपुढें मुत्सद्यांच्यानें लवकरच निभाव लागेनासा झाला.

इ. स. १८६० सालीं इटालियन पार्लमेंटाची नवीन निवडणूक झाली. त्यांत ग्यारीबाल्डीस लोकांचेतर्फे प्रतिनिधि निवडून देण्यांत आलें होतें. त्याप्रमाणें ता. १८ एप्रिल रोजीं तो पहिल्यानें सभासद या नात्यानें पार्लमेंट सभेस गेला. पार्लमेंटांत त्याचा पोषाख नेहमींप्रमाणेंच तऱ्हेवाईक होता व त्याजकडे सर्व लोक टकमक पाहात होते. या वेळीं पार्लमेंटपुढें ग्यारीबाल्डीच्या बिनपगारी शिपाई लोकांसंबंधानें प्रश्न होता. ग्यारीबाल्डीनें व्हिक्टर-ए-मॅन्युएल राजास आपल्या विश्वासू शिपायांबद्दल एक मागणी केल्याचें मागें सांगितलेंच आहे. ही मागणी राजानें अद्यापि मान्य केली नव्हती. ग्यारीबाल्डी व त्याचे शिपाई यांजबद्दल सरकारी अधिकाऱ्यांस एक प्रकारचा मत्सर वाटत असल्यामुळें, ते त्यासंबंधानें कोणतीही गोष्ट निघाली असतां राजाचें मन दूषित करण्यास सदोदित तयार असत. ही गोष्ट ग्यारीबाल्डीचे मनास नेहमीं लागून राहिलेली असे. यामुळें वर सांगितलेला विषय पार्लमेंटपुढें निघाला तेव्हां उभय पक्षांचीं मनें क्षुब्ध झालेलीं होतीं. बराच वादविवाद होऊन कौन्ट कॅव्हूर यास वर्मी लागतील असे शब्द भर सभेंत बोलून ग्यारीबाल्डी उठून गेला; परंतु तेथें तेवढ्यावरच संपलें. पुढें लवकरच ग्यारीबाल्डीच्या सूचनेप्रमाणें देशांतील सैन्याची संख्या वाढविण्याचें पार्लमेंटनें बहुमतानें कबूल केल्यामुळें ग्यारीबाल्डीचा राग बराच निवाला. व्हिक्टर-ए-मॅन्युएल राजानें मध्यस्थी करून कॅव्हूर व ग्यारीबाल्डी यांची मुलाखत खाजगी रीतीनें घडवून-

त्याला धरावा तरी पंचाईत, मोकळा सोडावा तरी पंचाईत. मनांतून त्यावर सर्वांचें प्रेम; परंतु तें बाहेरून दाखवून सोय नाहीं. तेव्हां सर्वांत उत्तम युक्ति म्हटली म्हणजे मोकळा सुटलेला हत्ती जसा न मारतां, न दुखवितां युक्तीनें चुचकारून ठाण्यावर नेऊन सोडतात, किंवा सर्कसमधील वाघ कसा तरी एकदांचा पिंजऱ्याच्या दारांतून आंत गेला म्हणजे जसा मोकळा सोडून देतात, तसेंच ग्यारीबाल्डी अनावर झाला म्हणजे त्याला निरुपाय म्हणून कैद करून परत कॅप्रेरा बेटांत नेऊन सोडून देण्यांत येत असे.

ग्यारीबाल्डी इकडे अटकेंत असतां त्याच्या सोबत्यांनीं अनेक तऱ्हांनीं पोपच्या राज्यास धोका आणण्याची खटपट चालू ठेविली होती. कैरोली नांवाच्या दोघां शूर व साहसी बंधूंनीं केलेलें धाडसी कृत्य तर इतिहासांत नांवाजण्यासारखें होतें. त्यांनीं टायबर नदीवर बोटींतून गुप्तपणें हत्यारें नेऊन तीं रोमच्या लोकांस पोंचविण्याचा प्रयत्न केला. ते किनाऱ्यावर तर उतरलेच, परंतु रोमन लोकांची त्यास कुमक न मिळाल्यामुळें पोपच्या शिपायांनीं त्या बंधूंपैकीं एकास किनाऱ्यावरील द्राक्षवेलींच्या बनांतच ठार केलें व दुसऱ्यास पोपच्या भयंकर तुरुंगांत नेऊन टाकलें. हें कैरोली कुटुंब अतिशय शूर म्हणून प्रख्यात आहे. या दोन बंधूंपैकीं धाकटा भाऊ बेनेडेटो यानें १८७८ सालीं आपला जीव धोक्यांत घालून हंबर्ट राजाचा जीव मारेकऱ्यांचे हातून वांचविला होता. पुढें तो राजकारणांत प्रधानकीचें काम करून विशेष प्रख्यातीस आला.

याच सुमारास पोपच्या शिपायांची एक बराकची बराक कांहीं अत्याचारी लोकांनीं डायनामाईटनें उडवून दिली व त्या अपघातांत पन्नास लोक मरण पावले. इकडे १२ हजार रोमन लोकांनीं पोपला अर्ज करून व्हिक्टर-ए-मॅन्युएलचे सैन्य रोममध्यें आणवावें म्हणून विनंति केली. या सर्व गोष्टींमुळें पोप भ्याला व स्वसंरक्षणार्थ फरान्सच्या सैन्याची मदत घेण्याचा त्यानें विचार केला.

इकडे हें सर्व चाललें असतां कॅप्रेरा बेटांतून आपली सुटका कशी करावी या विचारांत ग्यारीबाल्डीचें मन गढून गेलें होतें. बेटाचे सभोंवतीं पहाऱ्याकरितां चार सरकारी गलबतें ठेवून दिलीं होतीं. भोंवतींचे पहारेकरी बहुधा सावध असत. एके दिवशीं आपल्या मुलीला घेऊन होडींत बसून तो नित्यक्रमापेक्षां जरा लांब जात आहे असें पाहतांच सरकारी जहाजांतील लोकांनीं

आहे. त्या शक्तीचा समाजाकरितां योग्य उपयोग करणें हीच आमच्या कार्यसिद्धीची गुरुकिल्ली आहे. मनःपूत कृत्य करणें व तें करण्यास लागणारा स्वार्थत्यागहि करणें हाच काय तो श्रेष्ठ सद्गुण. एकी व दृढनिश्चय यांमध्येंच सर्व शक्तीचें मूळ बीज आहे, इत्यादि गोष्टींबद्दल माझ्या मनाची पक्की खात्री झाल्यामुळें, माझ्याप्रमाणेंच विश्वास असणाऱ्या या '**तरुण इटली**' नांवाच्या मंडळीमध्यें मी आपलें नांव दाखल करीत आहें. मी आजपासून अशी शपथ घेतों कीं, या मंडळीचे साहाय्यानें इटली देशाचे स्वतंत्र व लोकसत्ताक राष्ट्र करण्याकरितां मी जिवाभावानें अक्षय्य खटपट करीन. या मंडळीचे हेतु लोकांस समजण्यासाठीं मी कायावाचामनेंकरून त्यांना शिक्षण देईन. सद्गुणाशिवाय कोणतीहि वस्तु मिळाली तरी टिकत नाहीं! याकरितां मी नेहमीं सद्गुणानेंच वागेन. यापुढें मी दुसऱ्या कोणत्याहि मंडळीचा सभासद होणार नाहीं. या मंडळीचे सर्व हुकूम मी शब्दश पाळीन व प्राण गेला तरी ते बाहेर फोडणार नाहीं. या मंडळींतील इतर बांधवांना सल्लामसलत व साहाय्य देऊन मदत करीन. ही सर्व शपथ किंवा त्यांतील अंशहि जर मीं मोडला तर ईश्वराचा पुरा क्षोभ मजवर होईल व मनुष्यमात्र मला निंद्य मानूं लागेल, आणि असत्यवादी म्हणून माझ्या तोंडाला काळोखी लागेल."

समाप्त

